**<u>प्रेसनोट</u>** **दि. 02/01/2026**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून उपसंचालक आरोग्य विभाग, पुणे यांच्याकरीता लाच मागणी करणाऱ्या पुणे जिल्हा परिषदच्या आरोग्य सेवकावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 41 वर्ष, व्यवसाय-नोकरी |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | रामकिसन गंगाधर घ्यार , वय 43 वर्ष, पद- आरोग्य सेवक जिल्हा परिषद पुणे. रा ठी. सरकारी निवासस्थान क्र 1, आरोग्य केंद्र वाघोली, तालुका हवेली जिल्हा पुणे. (वर्ग-3) |
| **सुरवातीस मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 3,00,000/- (तीन लाख रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 3,00,000/- (तीन लाख रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 3,00,000/- (तीन लाख रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 04/12/2025 व 05/12/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 02/01/2026 |
| **ठिकाण** | जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाचे समोर सार्वजनिक रोडवर |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 9923444998) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 8425808058) |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार हे एक आरोग्य सेवक असून त्यांची जून 2025 मध्ये उपसंचालक कार्यालय कोल्हापूर मंडळ ते उपसंचालक कार्यालय पुणे मंडळ अशी अंतर मंडळ बदली झाली आहे. परंतु जून 2025 पासून आज पर्यंत त्यांना पुणे मंडळात पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी पोस्टिंग दिली नसून उपसंचालक कार्यालयातच आरोग्य सेवक पद नसतानाही ठेवून घेतले आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र बावडा तालुका इंदापूर जिल्हा पुणे येथे रिक्त असलेल्या आरोग्य सेवकाच्या पदावर नेमणूक होण्यासाठी बदलीचा विनंती अर्ज केला होता. यातील आरोपी पुणे जिल्हा परिषदेच्या अखतारीत आरोग्य सेवक म्हणून नोकरीस असून ते उपसंचालक डॉक्टर श्री भगवान पवार यांच्या रोजच्या संपर्कातील आहेत.

तक्रारदार हे त्यांच्या बदलीच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने उपसंचालक आरोग्य, पुणे मंडळ डॉ.भगवान पवार यांना भेटले असता त्यांनी तक्रारदारास यातील आरोपी रामकिशन घ्यार याना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे यातील आरोपीस भेटले असता त्याने तक्रारदाराने मागितलेल्या ठिकाणी बदली करण्यासाठी डॉ.भगवान पवार यांच्यासाठी 3 लाख द्यावे लागतील असे सांगून तीन लाख रूपयाच्या लाचेची मागणी केली असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि. 2/12/2025 रोजी पुणे लाच लुचपत प्रतिबंधक विभाग येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दिनांक 04/12/2025 व 05/12/2025 रोजी पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक रामकिशन घ्यार यांनी तक्रारदार यांचे बदलीच्या कामासाठी तक्रारदाराकडे डॉ.भगवान पवार, उपसंचालक आरोग्य विभाग,पुणे,यांचे करीता 3,00,000/- रूपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक 2/1/2026 रोजी आलोसे रामकिशन घ्यार यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदाराच्या वरील प्रमाणे बदलीच्या कामाकरता पडताळणीमध्ये डॉ भगवान पवार, उपसंचालक,आरोग्य विभाग,पुणे यांच्यासाठी मागणी केलेले 3,00,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदाराकडून स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.